# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सार्वजनिक आरोग्य खाते
### क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी-15.
काआअ/5111 /क्षरुस(वआ) दि.21.07.2023.

## जाहिरात

सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत क्षयरोग रुग्णालय समूहाच्या आस्थापनेवरील खालील नमूद **'विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार'** 12 पदे एका वर्षाकरिता कंत्राटी तत्वावर प्रत्येकी 6 महिन्या नंतर एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन मासिक ठोस मानधन रु.1,00,000/- (रु. एक लाख फक्त) इतक्या वेतनावर भरण्याकरिता खालील नमूद अर्हता धारण केलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**1) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार**- छातीविकारशास्त्र तंत्र ( Chest & TB) – **5 पदे**

शैक्षणिक अर्हता-

(1) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाची छातीविकारशास्त्रामध्ये पदव्युत्तर पदवी किंवा पदविका (MD Chest &TB/DNB/TDD/DTCD) प्राप्त केलेला असणे आवश्यक आहे.

(2) क्षयरोग विभागात काम केलेल्या उमेदवारास विशेष प्राधान्य.

(3) निवडीनंतर उमेदवारास अतिदक्षता विभागात काम करणे अनिवार्य असेल.

**2) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार** – मनोरुग्ण शास्त्र (Psychiatry) **4 पदे**

शैक्षणिक अर्हता-

(1) मनोरुग्ण शास्त्रातील पदवी किंवा पदविका (MD/DNB/Diploma).

(2) क्षयरोग रुग्णालयात काम केलेल्या उमेदवारास विशेष प्राधान्य.

**3) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार**- बालरोगतज्ञ (Paediatric) – **2 पदे**

शैक्षणिक अर्हता-

(1) बालरोग शास्त्रातील पदवी किंवा पदविका (M.D/DNB/DCH) प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे.

(2) बाल क्षयरोग विभागात काम केलेल्या उमेदवारास विशेष प्राधान्य.

**4) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार**- सुक्ष्मजीवशास्त्र (Microbiologist) – **1 पद**

शैक्षणिक अर्हता-

(1)उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाची सुक्ष्मजीवशास्त्रामध्ये पदव्युत्तर पदवी (MD Microbiology किंवा समतुल्य) प्राप्त केलेला असणे आवश्यक आहे.

(2)मान्यताप्राप्त विद्यापिठाची पॅथॉलॉजी व बॅक्टेरिऑलॉजी या विषयात पदविका (DPB) असलेल्या उमेदवारास प्राधान्य.

(3)अनुभव–पदव्युत्तर पदवी नंतरचा अनुभव विशेषतः क्षयरोग रुग्णालयातील अनुभवास प्राधान्य.

सर्वसाधारण अटी -

1) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार पदावरील नियुक्ती भविष्यात कोणत्याही परिस्थितीमध्ये नियमित करण्यात येणार नाही.

2) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार कंत्राटी तत्वावरील पदधारकास दर 6 महिन्यानंतर एक दिवसाचा खंड देण्यात येईल.

3) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार कंत्राटी तत्वावरील नियुक्ती आवश्यकता नसल्यास कुठल्याही क्षणी संपुष्टात आणण्यात येईल.

4) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार कंत्राटी तत्वावरील नियुक्ती ही नियमित तत्वावरील नियुक्तीकरिता ग्राहय धरण्यात येणार नाही.

5) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी पदधारकाने चुकीची माहीती प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याने किंवा कोणतीही माहीती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती रद्दबादल करण्यात येईल.

6) नियुक्तीच्या वेळी 200 रुपयांच्या बॉन्ड पेपरवर विहित नमुन्यातील कंत्राट करार करुन संबंधीत आस्थापनेस 07 दिवसाच्या आत सादर करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती रद्दबादल करण्यात येईल.

7) उमेदवाराच्या कंत्राटी तत्वावरील नेमणूकीनंतर त्रैमासिक अनुपालन अहवाल (performance report) जसे की दैनंदीन उपस्थिती, केलेल्या शस्त्रक्रीयांचा संख्यात्मक व गुणात्मक अहवाल तसेच प्रमुख रुग्णालयात संदर्भित करण्यात येणा-या रुग्णांच्या संख्येतील घट इत्यादिच्या सापेक्ष सहा महिन्यांनी एक दिवसाचा खंड देऊन पुढील कालावधीकरिता म्हणजेच नेमणूक झाल्यापासून संपूर्ण कालावधी दिनांक 22.08.2024 पर्यत कंत्राटी सेवा पुढे चालू ठेवण्यात येईल.

8) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार कंत्राटी तत्वावरील पदधारकाने नियुक्ती कालावधीत शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

9) कुठल्याही कारणास्तव पदधारकास पदाचा राजीनामा दयावयाचा असल्यास त्याने एक महिना आधी पुर्वसूचना देणे बंधनकारक आहे.

10) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार (Specialty Medical Consultants) क्षयरोग रुग्णालय प्रमूखांच्या अधिपत्याखाली कर्तव्यार्थ राहतील.

11) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार संबधीत युनिटमध्ये पूर्णवेळ (सकाळी ८.०० ते दूपारी ४.००) कार्यरत राहतील व रुग्णसेवेच्या आवश्यकतेनूसार रात्रपाळीतही कार्यरत राहतील. गरज भासल्यास आपातकालीन परिस्थितीत इतर विभागातही रात्रपाळीतही आवश्यक सेवा म्हणून काम करावे लागेल.

12) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार (Specialty Medical Consultants) यांची रुग्णसेवेच्या आवश्यकतेनुसार इतर रुग्णालयात वदली करण्यात येईल.

13) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार यांना चक्रांकीत पद्धतीन साप्ताहीक रजा देण्यात येईल.

14) विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार आपातकालीन काळात रुग्ण सेवा देण्यासाठी उपलब्ध असतील.

15) पदधारक विहीत अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती त्वरित रद्द करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

16) पदधारकाने विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार या पदाचे आदेश प्राप्त झाल्यावर सात दिवसाच्या आत त्वरीत कर्तव्यार्थ हजर राहावे लागेल अन्यथा सदर पदाच्या नियुक्तीकरीता आपणास स्वारस्य नसल्याचे समजून पुढील उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल.

17) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

<u>कर्तव्ये व जवाबदा-या-</u>

1) रुग्णाना 24x7 सेवा देणे, बाह्यरुग्ण सेवा व आंतररुग्ण सेवा व अतिदक्षता सेवा, शस्त्रक्रिया सेवा इत्यादी रुग्णांशी निगडीत सेवा पूरविणे.

2) क्षयरोग रुग्णालयातील उपलब्ध असलेल्या सेवांच्या क्षमतेचा पूर्णत: वापर करणे.

3) सर्व निवासी, कंत्राटी तसेच निम्नवैदयकीय कर्मचारी वर्गाला क्षयरुग्णांच्या उपचारासंबंधीचे योग्य मार्गदर्शन करणे तसेच त्यांच्या कामाचे पर्यवेक्षण करणे.

4) रुग्णालयीन कामकाजाचा आढावा व पुनर्विलोकन करण्यास प्रशासनास सहाय्य करणे.

5) वरिष्ठ पातळीवरुन वेळोवेळी नेमुन दिलेल्या जवाबदा-या पार पाडणे. वैद्यकीय अधिक्षक व खातेप्रमुख यांना वेळोवेळी अहवाल सादर करणे.

वैद्यकीय अधिक्षक क्षयरोग रुग्णालय यांचे कार्यालयात जाहिरात प्रसारित झाल्यापासून (दि. 04.08.2023 ते 12.08.2023) आलेले अर्ज प्रचलित निवड प्रक्रियेनुसार निवडण्यात येतील.

Abhui
1/8/2023
वैद्यकीय अधिक्षक
क्षयरोग रुग्णालय समूह